MHNS160008892021

**<u>नियमीत फौजदारी खटला क्र. ११४/२०२१ मध्ये निशाणी ६०</u>**

**<u>खाली आदेश</u>**

**स्टेट वि. माणिक भालेराव**

१. सदरचा अर्ज सरकारी पक्षाने त्यांच्याविरुद्ध झालेला पुरावा बंदचा आदेश रद्द होऊन साक्षीदारांची साक्ष नोंदवण्याची परवानगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जामध्ये सरकारी पक्षाचे कथन आहे की, सदर प्रकरणातील तपासी अंमलदारांना न्यायालयाने साक्षी समन्स काढले होते. मात्र ते न्यायालयात हजर न झाल्यामुळे जानेवारी २०२६ मध्ये न्यायालयाने सरकारी पक्षाचा पुरावा बंद केलेला आहे. सदरचा गुन्हा गंभीर स्वरुपाचा असल्यामुळे या मध्ये तपासी अधिकाऱ्यांची साक्ष नोंदवणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे जानेवारी २०२६ मध्ये सरकारी पक्षाचा पुरावा बंद केल्याचा आदेश रद्द करुन त्यांना तपासी अधिकाऱ्याची साक्ष नोंदवण्याची परवानगी देण्याची विनंती सदर अर्जाद्वारे सरकारी पक्षाने केलेली आहे.

२. सदर अर्जाला आरोपींच्या विधिज्ञांनी जोरदार आक्षेप नोंदवलेला असून त्यांनी कथन केले आहे की, सदर प्रकरणामध्ये सरकारी पक्षाला त्यांचा पुरावा देण्याची पुरेपुर संधी वारंवार देण्यात आलेली होती. मात्र असे असतांनाही सरकारी पक्ष त्यांचा पुरावा देऊ शकले नाही. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध पुरावा नाहीचा आदेश पारित केलेला आहे. सरकारी पक्षाने सदरचा अर्ज केवळ प्रस्तुतचे प्रकरण लांबवण्यासाठी दिलेला असल्यामुळे सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती आरोपीच्या विधिज्ञांनी केलेली आहे.

३. सरकारी पक्षाचा अर्ज व त्यावरील आरोपींचे म्हणणे वाचले. दोन्ही विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. सदरचे प्रकरण सन २०२१ चे असून यामध्ये सरकारी पक्षाने ८ साक्षीदारांची साक्ष नोंदवलेली आहे व त्यानंतर तपासी अंमलदारांची साक्ष नोंदवण्याची सरकारी पक्षाला वारंवार संधी देण्यात आली. सन २०२४ मध्ये सरकारी पक्षाने त्यांचा शेवटचा साक्षीदार तपासला व त्यानंतर जवळपास २ वर्षांची संधी देऊन देखील सरकारी पक्ष तपासी अंमलदारांची साक्ष नोंदवू शकले नाही. सरकारी पक्षाच्या अर्जानुसार तपासी अंमलदारांना साक्ष देण्यासाठी न्यायालयामार्फत नोटीस/समन्स काढण्यात आले. मात्र तरी देखील ते न्यायालयात हजर राहिले नाहीत व त्यानंतर त्यांना हजर ठेवण्यासाठी सरकारी पक्षाने कोणतीही आवश्यक कार्यवाही केली नाही. सदर प्रकरणाचे अवलोकन केले असता केवळ आणि केवळ सरकारी पक्षाच्या पुराव्यासाठी व तपासी अंमलदारांची साक्ष नोंदवण्यासाठी सदरचे प्रकरण २ वर्षापर्यंत कोणत्याही प्रगतीविना प्रलंबित राहिलेले होते. सदर प्रकरणात सरकारी पक्षाला प्रमाणापेक्षा जास्त संधी देण्यात आल्याचे दिसून येते. मात्र तरीही सरकारी पक्ष तपासी अंमलदारांची साक्ष नोंदवू शकले नाही.

४. त्यामुळे जानेवारी २०२६ मध्ये सरकारी पक्षाचा पुरावा बंद करण्याचा आदेश पारित करण्यात आला व त्यानंतर फेब्रुवारी २०२६ मध्ये आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ नुसार निवेदन नोंदवण्यात आले व तेव्हापासून म्हणजेच मागील ३ तारखांपासून सदरचे प्रकरण अंतिम युक्तिवादासाठी प्रलंबित आहे. असे असतांना व इतक्या विलंबाने सरकारी पक्षाने पुन्हा सदरचा अर्ज दिलेला आहे. संचिकेनुसार सरकारी पक्षाला प्रस्तुतकामी प्रमाणापेक्षा जास्त संधी देऊनही ते तपासी अंमलदारांची साक्ष नोंदवू शकले नाही. त्यामुळे ही सर्व वस्तुस्थिती पाहूनच व सरकारी पक्षाला वाजवीपेक्षा जास्त संधी देऊनच त्यांचा पुरावा बंद करण्यात आलेला आहे. त्यामुळे सरकारी पक्षाने

दिलेला सदरचा अर्ज कायद्याने चालण्यास पात्र नाही व अशा अर्जामुळे विनाकारण सदरचे प्रकरण प्रलंबित राहत आहे हे देखील दिसून येते. सबब, वरील सर्व विवेचनाच्या अनुषंगाने मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**– आदेश –**

१. सरकारी पक्षाचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. सरकारी पक्ष व आरोपीचे विधिज्ञ यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी पुढील तारखेस विनाविलंब अंतिम युक्तिवाद करावा, दोघांपैकी एकाही बाजूने युक्तिवाद न केल्यास त्या अनुषंगाने योग्य तो आदेश पारित केला जाईल याची दोन्ही पक्षकार व त्यांच्या विधिज्ञांनी नोंद घ्यावी.

SUNGARE VRUSHALI DINANATH
Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2026.05.13 17:19:30 +0530

दिनांक :– १३.०५.२०२६
ठिकाण :– चांदवड

(वृषाली दी. सुंगारे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिका क.स्तर,
चांदवड.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अधिकथन करतो की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या आदेशामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | :– | ***एस. आर. हटकर,***<br>लघुलेखक (श्रेणी–३) |
| न्यायालयाचे नाव | :– | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग क.स्तर, चांदवड. |
| आदेशाची तारीख | :– | १३/०५/२०२६ |
| आदेशावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | :– | १३/०५/२०२६ |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | :– | १३/०५/२०२६ |